**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडनवीस यांचा, तर उपमुख्यमंत्री म्हणून एकनाथ शिंदे आणि अजीत पवार यांचा शपथविधी

- भारतीय वायु यान विधेयक २०२४ आज राज्यसभेत मंजूर, गदारोळामुळे लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब

- अदानी लाचखोरी प्रकरणी संयुक्त संसदीय समितीतर्फे चौकशी करण्याची विरोधकांची मागणी

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मुंबई महापालिकेची जय्यत तयारी

**आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे ८१० अंकांची वाढ

**<><><><><>**

राज्याचे नवे मुख्यमंत्री म्हणून भाजपा नेते देवेंद्र फडनवीस यांनी आज शपथ घेतली. मुंबईत आझाद मैदानात झालेल्या समारंभात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी फडनवीस यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली.

**बाईटः देवेंद्र फडनवीस**

यावेळी उपमुख्यमंत्री म्हणून शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी शपथ घेतली. शपथविधी सोहळ्याला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची विशेष उपस्थिती होती. केंद्रीय मंत्री

राजनाथ सिंह, अमित शहा, नितीन गडकरी, निर्मला सीतारामन, शिवराजसिंह चौहान, जेपी नड्डा, रामदास आठवले, जयशंकर, बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार, आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू, उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, यांच्यासह राष्ट्रीय लोकशाही आघाडीशासित राज्यांचे मुख्यमंत्री आणि नेते यावेळी उपस्थित होते. तसंच उद्योग, क्रीडा, चित्रपटसृष्टीसह इतर क्षेत्रातले मान्यवरही उपस्थित होते.

शपथविधी सोहळ्यासाठी आझाद मैदानाचा परिसर सुशोभित करण्यात आला होता. मुख्य कार्यक्रमाच्या आधी संगीतकार अजय अतुल यांच्यासह इतर कलाकारांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केला. या शपथविधी सोहळ्यासाठी देशभरातून भाजपाचे नेते आणि पदाधिकारी तसंच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

शपथविधी झाल्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांनी मंत्रालयात प्रवेश केला. मंत्रालयाच्या प्रांगणातल्या राजमाता जिजाऊ माँ साहेब, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा जोतीराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना, तसंच संविधान उद्देशिकेला त्यांनी अभिवादन केलं.

**<><><><><>**

विकसित भारताच्या उद्दिष्टाकडे वाटचाल करताना देशाच्या आर्थिक, सामाजिक मूल्यांवर परदेशी संस्थांकडून दोषारोप होत असल्याचा मुद्दा राज्यसभेत शून्य प्रहरात भाजपचे खासदार सुधांशु त्रिवेदी यांनी मांडला, त्यांना बोलण्यासाठी राज्यसभा अध्यक्ष जगदीश धनखड यांनी अधिक वेळ

दिल्याबद्दल विरोधी पक्षांनी आक्षेप घेत गदारोळ केला. त्यामुळे अध्यक्षांनी कामकाज १२ वाजेपर्यंत तहकूब केलं. त्यानंतर राज्यसभेचं कामकाज सुरळीतपणे झालं.

भारतीय वायुयान विधेयक २०२४ आज राज्यसभेत मंजूर झालं. लोकसभेत हे विधेयक पावसाळी सत्रात मंजूर झाले आहे. या विधेयकात विमानाचे उत्पादन, देखरेख, दुरुस्ती, आयात तसंच अपघाताची चौकशी याबद्दलचे नियम आहेत.

गेल्या १० वर्षात देशभरात साडेदहाहजाराहून अधिक नवीन टपाल कार्यालयं उघडली असून त्यातली ९० टक्के कार्यालयं ग्रामीण भागात , तर ५ हजाराहून अधिक कार्यालयं नक्षलवादी चळवळीने प्रभावित क्षेत्रात आहेत अशी माहिती केंद्रीय दूरसंवाद राज्यमंत्री चंद्रशेखर पेम्मासानी यांनी आज राज्यसभेत दिली. येत्या काळात देशात दर ३ किलोमीटरवर एक टपाल कार्यालय सुरु करण्याचं सरकारच उद्दिष्ट असल्याचं त्यांनी सांगितलं.

गेल्या १० वर्षात इंटरनेट डेटा ची किंमत प्रति २६९ रुपये प्रति गिगा बाईट वरून ८ रुपये ३१ पैसे प्रति गिगा बाईट पर्यंत खाली उतरल्याचंही पेम्मासानी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

भाजपा सदस्य निशिकांत दुबे यांनी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांवर केलेले आरोप तसंच उत्तर प्रदेशातल्या संभल इथं झालेला हिंसाचार या मुद्द्यांवरून विरोधी पक्षाच्या सदस्यांनी केलेल्या गदारोळामुळे आज लोकसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करावं लागलं. शून्य प्रहरात त्यांनी एका फ्रेंच प्रकाशनाच्या अहवालाचा उल्लेख करून सांगितलं की अशा शक्ती

भारतीय संसद आणि देशाच्या अर्थव्यवस्थेत अडथळे आणण्याचा प्रयत्न करत असून प्रियंका गांधी, राहुल गांधी समाजमाध्यमांवरच्या हँडलवर हे वृत्त प्रसिद्ध करत आहेत, असं दुबे म्हणाले. त्यानंतर काँग्रेस, द्रमुक आणि इतर सदस्यांनी गदारोळ केल्यामुळे आधी दुपारी दोन वाजेपर्यंत आणि नंतर दुपारी ३ वाजेपर्यंत कामकाज तहकूब करावं लागलं. तीन नंतर कामकाज पुन्हा सुरू झाल्यानंतर  रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी रेल्वे सुधारणा विधेयकावर उत्तर द्यायचा प्रयत्न केला पण गदारोळ कायम राहिल्यामुळे कामकाज दिवसभरासाठी तहकूब झालं.

**<><><><><>**

अदानी लाचखोरी प्रकरणी आज संसदेच्या परिसरात विरोधी पक्षांनी जोरदार निदर्शने केली. विरोधी पक्ष नेता काँग्रेस खासदार राहुल गांधी यांच्यासह राजद, डीएमके आदी प्रमुख विरोधी पक्षांनी निदर्शनं केली या प्रकरणाची संसदेच्या संयुक्त समितीतर्फे चौकशी करण्याची मागणी यावेळी विरोधकांनी केली.

**<><><><><>**

बीड शहरातल्या बालेपीर भागात अकरा वर्षांपूर्वी खंडणीच्यावरून झालेल्या हत्या प्रकरणात तब्बल पाच वर्षानंतर आज विशेष मोक्का न्यायालयाने १४ जणांना दोषी ठरवलं. शिक्षेची सुनावणी सोमवारी होईल अशी शक्यता आहे.

**<><><><><>**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त राज्यभरातून येणाऱ्या अनुयायांना सुविधा पुरवण्यासाठी मुंबई महापालिकेनं जय्यत तयारी केली आहे. पालिकेनं चैत्यभूमी परिसरात नियंत्रण कक्ष उभारला असून रुग्णवाहिका, आरोग्य सेवा, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वच्छता, शौचालये अशा सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. चैत्यभूमी परिसरात लावलेल्या एलईडी स्क्रीनवर मुख्य कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण पाहण्याची सोय केली आहे. चैत्यभूमी जवळच्या समुद्रात जीवरक्षक बोटी, अग्निशमन यंत्रणाही तैनात केली आहे. या वेळी पालिकेच्या जनसंपर्क विभागानं बाबासाहेबांच्या जीवनपटावर आधारित छायाचित्र प्रदर्शन आयोजित केलं आहे.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सने आज ८१० अंकांची उसळी घेतली आणि तो ८१ हजार ७६६ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही २४१ अंकांची वाढ नोंदवत २४ हजार ७०८ अंकांवर बंद झाला. तंत्रज्ञान क्षेत्रातल्या कंपन्यांना या तेजीचा फायदा झाला. परदेशी गुंतवणूकदार संस्थांनी मोठ्या प्रमाणावर खरेदी केल्यामुळे बाजारात तेजी राहिल्याचं शेअर बाजारातल्या सूत्रांनी सांगितलं.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमधे, भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातल्या एकदिवसीय मालिकेत, आज ब्रिस्ब्रेन इथं झालेल्या पहिल्या सामन्यात भारताला पराभव पत्करावा लागला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारताचा संघ ३५ व्या षटकातच १०० धावा करुन गारद झाला. मेगन स्कट हिनं पाच

बळी घेतले. तर किम गर्थ, ॲश्ले गार्डनर, ॲनाबेल सुदरलँड आणि ॲलेना किंग यांनी प्रत्येकी एकबळी मिळवला.

ऑस्ट्रेलियानं सतराव्या षटकात पाच गड्यांच्या मोबदल्यात ही धावसंख्या पार केली. जॉर्जिया ओलच्या नाबाद ४६, आणि फिबी लिचफिल्डच्या ३५ धावांच्या बळावर ऑस्ट्रेलियानं विजय साकार केला. भारतातर्फे रेणुका सिंहनं तीन तर प्रिया मिश्रानं दोन गडी बाद केले.

**<><><><><>**

सिंगापूर इथं सुरु असलेल्या, यंदाच्या फिडे जागतिक बुद्धीबळ स्पर्धेत, भारताच्या डी. गुकेश आणि चीनच्या डिंग लेरेन यांच्यातली आठवी फेरीही अनिर्णित राहिली. दोघांनाही प्रत्येकी ४ गुण मिळाले असून त्यांच्यातील अनिर्णित राहिलेली ही सलग पाचवी फेरी आहे. त्यांनी आतापर्यंत एक एक गेम जिंकला असून त्यांचे ६ गेम अनिर्णित राहिले आहेत. या स्पर्धेचं अजिंक्यपद जिंकण्यासाठी दोघांनाही प्रत्येकी ३ पूर्णांक ५ दशांश गुणांची आवश्यकता आहे.

**<><><><><>**

बुलढाणा जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून ढगाळ वातावरणामुळे थंडीचा कडाका कमी झाला आहे. सांगली जिल्ह्यातल्या मिरज इथंही आज संध्याकाळी जोरदार पाऊस झाला.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात राज्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. विदर्भात अनेक ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी तर कोकणात तुरळक ठिकाणी किमान तापमानात वाढ झाली. राज्यात

सर्वात कमी किमान तापमान चंद्रपूर इथं १७ अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात, राज्यातल्या चारही विभागांमधे तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यात पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//